जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 DEC 2023
लोकमत

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त नाट्यप्रयोग

# शिवाजी विद्यापीठाच्या 'टूरटूर'ची स्वारीने रसिकांना हसविले खळखळून

**राज्य नाट्य स्पर्धा परीक्षण**

डॉ. प्रकाश मुंज



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी 'टूर टूर'ची स्वारी केशवराव भोसले नाट्यगृहात आणत उत्स्फूर्त कलाप्रयोगातून सोमवारी रसिक प्रेक्षकांना खळखळून हसविले.

नामांकित लेखक पुरुषोत्तम बेर्डे यांच्या 'टूरटूर' नाटकाद्वारे विजय कदम, लक्ष्मीकांत बेर्डे, चित्रा पालेकर या सारख्या प्रसिद्ध कलाकारांनी रसिक प्रेक्षकांची फुल्ल कॉमेडी करून सोडले होते. दिग्दर्शक डॉ. संजय तोडकर यांनी नव्यानं 'टूरटूर' सादर करताना नाटकात काही काळानुरूप बदल केले आहेत. वग नाट्याचा बाज बदलून स्वगत, निवेदन शैली व कंडक्टरचा रोल विद्यार्थिनीला देण्याचा प्रयोग यशस्वी करून दाखवला आहे. डॉ. प्रशांत नागावकर यांनी प्रा. सुटेकरांची भूमिका उत्तम पार पाडली आहे. सर्टिफिकेट कोर्सपासून पदवीत्तर अभ्यासक्रम शिकणारे सर्वच कलाकार, यात आसावरी कुलकर्णी, सिद्धांत खांडेकर, दिव्या गावस, ऋतुजा बडवे यांचा अभिनय प्रेक्षणीय आहे. प्राध्यापक, ड्रायव्हर व कंडक्टर वगळता सर्वच विद्यार्थी कलाकारांनी जे उपलब्ध होईल त्याप्रमाणे आपापली वेशभूषा धारण केली आहे. प्रकाश, संगीत, वादक कथा, पात्र, प्रसंगानुकूल आहेत. विद्यार्थ्यांची बोली, भाषेतून होणारे विनोद, सौजन्य दिन साजरा करणे, गावात सांस्कृतिक कार्यक्रम यातून विद्यार्थी १५ दिवस धम्माल करतात. विशेष म्हणजे या टूरमध्ये ट्रॅव्हल्स कंपनीच्या मालकाचीच मुलगी मुलाचे रूप क्लीनर बनत एन्जॉय करते.

## नाटक : टूरटूर

लेखक : पुरुषोत्तम बेर्डे, दिग्दर्शक : डॉ. संजय तोडकर, नेपथ्य : विकास कांबळे व रोहित घोलप, प्रकाश योजना : युवराज केळुसकर, संगीत : संदेश गावंदे, गायत्री निकम, मयूरी कांबळे, सहेली मुलाणी, वादक : प्रशांत देसाई, विक्रम परीट, ओंकार सूर्यवंशी, वेशभूषा : रितिका राजे, सादरकर्ती संस्था : संगीत व नाट्यशात्र विभाग, शिवाजी विद्यापीठ.

## भूमिका व कलाकार :

सूत्रधार : विशाखा जोशी, सख्या : आसावरी कुलकर्णी, प्रा. सुटेकर : प्रशांत नागावकर, ड्रायव्हर : सिद्धांत खांडेकर, कंडक्टर : दिव्या गावस, क्लीनर : ऋतुजा बडवे, गुंड पाटील : स्वप्निल घुले, सरदार : शुभम पाटील, घड्याळी : प्रवेश ताटी, धारगळकर : सिद्ध उटगी, विनोद : अमृत सावंत, शहा : अजय फोंडेकर, बॅनर्जी : शोषन दास, मूर्ती : श्रवण नाईक.

## शेवटचे नाटक - ट्रायल

लेखक : चं. प्र. देशपांडे, दिग्दर्शक : सुविद्य कुलकर्णी, सादरकर्ती संस्था : अभिरुची, कोल्हापूर. स्थळ : केशवराव भोसले नाट्यगृह, सायं. ७ वाजता.

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत 20 DEC 2023
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नाट्यशास्त्र विभागाची टुर सफल : टुरटुर



कोल्हापूर : राज्य नाट्य स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने सादर केलेल्या टुरटुर नाटकातील एक प्रसंग.

शिवाजी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने ज्ञानेश मुळे दिग्दर्शित अन एनिमी ऑफ द पिपल, तुघलक, उद्ध्वस्त धर्मशाळा, अंधायुग ही क्लासिक नाटकं सादर केलीत. अंधायुग नाटकाने तर स्पर्धा गाजवली. आजपर्यंतचा हा देदिप्यमान प्रवास (टुर) आणि यावर्षी राज्यनाट्य स्पर्धेमध्ये पुरुषोत्तम बेर्डे लिखित, संजय तोडकर दिग्दर्शित टुरटुर हे नाटक सादर झाले.

एकांकिका ते नाटक असा टुरटुर नाटकाचा प्रवास. १९७५ च्या सुमारास जे. जे. इन्स्टिट्युटच्या विद्यार्थ्यांच्या वतीने या एकांकिकेचा पहिला प्रयोग झाला.

प्रेक्षकांची मागणी आणि प्रतिसाद या एकांकिकेला नाटकापर्यंत घेवून गेली. रविवार दि. २७ फेब्रुवारी १९८३ रोजी पुरुषोत्तम बेर्डे लिखित–दिग्दर्शित टुरटुर या व्यावसायिक नाटकाचा पहिला प्रयोग झाला आणि ९ नोव्हेंबर १९८३ पर्यंत याचे शंभर प्रयोग झाले. ३ मार्च १९९५ पर्यंत ही टूर अव्याहतपणे चालतच राहिली. सुधीर जोशी, चित्रा पालेकर, पद्मश्री जोशी, लक्ष्मीकांत बेर्डे, विजय कदम, विजय चव्हाण, विजय केंकरे, चेतन दळवी, प्रदीप पटवर्धन, दीपक शिर्के, मंगेश दत्त आणि प्रशांत दामले हा पहिल्या प्रयोगांमधला कलाकार चमू. यातील बऱ्याच दिग्गज कलाकारांच हे पहिलं नाटक ज्या नाटकाने त्यांना ओळख दिली. पुरुषोत्तम बेर्डे म्हणतात, 'हा नाट्यप्रकार लिहिताना माझ्यातल्या लेखकाने बऱ्याचशा जागा दिग्दर्शकासाठी आणि कलावंतांसाठी राखुन ठेवल्या आहेत. त्या त्या जागेवर योग्य ते दिग्दर्शकीय संस्कार झाल्यास हा एक मनोरंजक नाट्यप्रकार होऊ शकतो'.

पदव्युत्तर अभ्यासक्रमात संशोधन पध्दती हा विषय अनिवार्य केला आहे. त्यामध्ये संशोधनाची व्याख्या करताना अभ्यासक फॉक्स म्हणतो, 'आपण काय करतो? का करतो? हे आपल्याला माहीत असलं पाहिजे. हे नाटकालाही लागु आहे. दिग्दर्शकांनी मनोगतात सर्व विद्यार्थ्यांना संधी, मनोरंजन, विनोद यासाठी टुरटुर हे स्पष्ट केलंय. त्यामुळं नाट्यशास्त्र विभाग आणि टुरटुर नाटक निवडलं? कसं काय? प्रेक्षकांतील बागुल बुवांच्या अशा प्रश्नांना अर्थ उरतो कुठे.



राज्यनाट्यच्या निमित्ताने जास्तीत जास्त कलाकारांना संधी मिळते. या नाटकातून जास्त कलाकारांना संधी देण्याचा प्रयत्न केला. प्रोसेसचा आनंद समाधानकारक.

**– संजय तोडकर, दिग्दर्शक, टुरटुर नाटक**

टिमवर्क, लाईव्ह संगीत, रंगमंचावर प्रत्यक्षात बस आणि ती पळताना मागे सायक्लोवर रस्त्याची चित्रफित त्याला पुरक प्रकाशयोजनेसहीत टुरटुर नाटकाने उत्तम सादरीकरण केले. भरतमुनींनी सांगितलेल्या कायिक अभिनयाचा ओव्हर डोस झाला असावा. कॉकटेल सॉंग आणि डान्स ब्लंट. दिग्दर्शकानी मुलांकडुन प्रचंड कष्टप्रद काम करुन घेतलेलं दिसत होतं. कलाकारांनीही त्याला प्रचंड ऊर्जेसहीत प्रतिसाद देत एक मनोरंजक नाटक सादर केलं. टुरटुरचा हा प्रवास आनंददायी ठरला!

**पात्र परिचय :** **सूत्रधार :** विशाखा जोशी, **सख्या :** आसावरी कुलकर्णी, **मुले : बॅनर्जी :** शोवन दास, **शहा :** अजय फोंडेकर, **विनोद :** अमृत सावंत, **मूर्ती :** श्रवण नाईक, **धारगळकर :** सिद्धू उटगी, **घडीयाली :** प्रवेश तारी, **सरदार :** शुभम पाटील, **प्रा. सुटेकर :** प्रशांत नागावकर, **गुंड पाटील :** स्वप्निल घुले, **ड्रायव्हर :** सिद्धांत खांडेकर, **कंडक्टर :** दिव्या गावस, **क्लिनर :** ऋतुजा बडवे.

**नाटकाचे नाव :** टुरटुर
**सादरकर्ती संस्था :** संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ
**लेखक :** पुरुषोत्तम बेर्डे
**दिग्दर्शक :** डॉ. संजय पांडुरंग तोडकर
**प्रकाश योजना :** युवराज केळुस्कर
**नेपथ्य :** विकास कांबळे, रोहित घोलप
**रंगमंच सहाय्य :** शिरीष विचारे, मल्हार जोशी
**वेशभूषा :** डॉ. राजश्री खटावकर
**संगीत दिग्दर्शन, गायक, संगीतकार :** संदेश गावंदे
**वादक :** प्रशांत देसाई, विक्रम परीट, ओंकार सूर्यवंशी
**नृत्य दिग्दर्शन :** भाग्यश्री कालेकर, शोवन दास
**नृत्य :** संजना परब, वैभवी कापसे, गौरी पाटील, अक्षता पाटील, तेजस्विनी इटगोंडर, सुहानी कुणकेरकर
**संगीत कोरस :** गायत्री निकम, मयुरी कांबळे, सहेली मुल्लाणी,

**-किरणसिंह चव्हाण, कोल्हापूर**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2023
सकाळ

राज्य नाट्य स्पर्धा २०२३

# भन्नाट करमणुकीचा प्रयोग 'टुरटुर'

▶ जितेंद्र देशपांडे

**चित्रपट आणि नाट्यसृष्टीमध्ये समोर येणाऱ्या करमणूक प्रधान कलाकृतीमधील विनोदाचा दर्जा किंवा पद्धत वेळोवेळी बदललेली आहे. बहुसंख्य प्रेक्षकांच्या बाबतीत पाहिलं तर कोणती विनोदी कलाकृती स्वीकारायची किंवा उचलून धरायची हे त्या लोकांची सामाजिक आणि मानसिक स्थिती ठरवते असे दिसते.**

करमणूक करीत प्रबोधन करणे हा कलाकृती सादरीकरणा मागचा विचार असल्याने विनोदातून करमणूक हा प्रकार खूप पूर्वीपासूनच सुरू झालेला आहे. आपल्याला ज्ञात असणाऱ्या काळामध्ये म्हणजे साधारणपणे चिं. वि. जोशी, प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, शंकर पाटील, व. पु. काळे असा तो प्रवास म्हणता येईल. समाजाची मानसिकता ओळखून या दर्जेदार लेखकांनी कधी निखळ विनोद दिला, कधी विडंबन, तर कधी उपहासात्मक चिमटे काढून प्रेक्षकांना हसवत हसवत अंतर्मुख केले. याचवेळी विनोदाचा दुसरा प्रकारही सुरू होता तो लोक परंपरेला धरून होता. यामध्ये वगनाट्य, दशावतार इत्यादी पारंपारिक लोककला सादरीकरणाचे प्रकार खूप लोकप्रिय होते. वसंत सबनीसांसारखे लेखक किंवा दादा कोंडके, रामनगरकर, दादू इंदुरकर यांच्यासारखे कलाकार आपल्याला याच लोकरंगभूमीवरून मिळाले.

काळ बदलला, विनोद बदलला. काळाच्या ओघात एकेकाळचा निखळ विनोद मग फालतू जोकही ठरला. तरीही अनेक कलाकृतीमधून निर्माण झालेले विनोद हे कालातीत ठरले आहेत.आजही ते ऐकताना किंवा पाहताना दर्जेदारच वाटतात. सर्वच वर्गातील रसिक त्यांच्या आठवणींमध्ये रमूनही जातात.

१९८३ च्या दरम्यान मराठी रंगभूमीवर असेच एक विनोदी नाटक अवतरले आणि त्याने महाराष्ट्रभर थैमान घातले. नंतर नावारूपाला आलेले अनेक दर्जेदार नट या नाटकाने रंगभूमीला दिले आणि ते नाटक म्हणजे टुरटुर. पुरुषोत्तम बेर्डे यांनी लिहिलेल्या आणि दिग्दर्शित केलेल्या या नाटकातील मूळ कलाकार होते लक्ष्मीकांत बेर्डे, विजय कदम, प्रदीप पटवर्धन, रवींद्र बेर्डे, चित्रा पालेकर आदी. याच नाटकाची निर्मिती कोल्हापुरातील संगीत आणि नाट्यशास्त्र विभाग छत्रपती शिवाजी विद्यापीठ यांनी केली. यावर्षीच्या राज्य नाट्य स्पर्धेमध्ये अनेक सकस नाटकांनंतर सादर झालेले हे सतरावे नाटक.

रंगभूमीचे प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या नाट्यशास्त्र विभागाने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग असावा या उद्देशाने या विनोदी नाटकाची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. नाट्यशास्त्र विभागाचा प्रत्येक विद्यार्थी रंगकर्मी म्हणून काही स्वप्न पाहत असतो. व्यावसायिक रंगभूमी त्याला खुणावत असते. या नाटकात काम करताना पुढे आपण काय केले पाहिजे आणि काय टाळले पाहिजे याचा अनुभव त्यांना मिळाला असावा.

नाटकाचे दिग्दर्शक संजय तोडकर हे गेली अनेक वर्षे चित्रपट आणि नाट्यसृष्टीशी संबंधित आहेत. अनेक दर्जेदार नाट्यकृतींची प्रकाशयोजना त्यांनी केलेली आहे आणि त्यामध्ये त्यांनी महाराष्ट्र राज्याची अंतिम स्पर्धेतील ही पारितोषिके पटकावलेली आहेत. या अनुभवी रंगकर्मीने दिग्दर्शित केलेल्या नाटकातील कलाकारांमध्ये प्रचंड ऊर्जा जाणवत होती. सर्व कलाकारांचे पाठांतर खूप छान होते. जास्तीत जास्त कलाकारांना रंगमंचावर वावरण्याचा अनुभव देण्याच्या उद्देशाने नाट्यशास्त्र विभागाने केलेले हे नाटक प्रेक्षकांची करमणूक करण्याचा प्रयत्न करीत राहिले. संघाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.



कोल्हापूर : राज्य नाट्य स्पर्धेत सोमवारी शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाने 'टुरटुर' या नाटकाचा प्रयोग सादर केला.

## रंगमंच व्यवस्था

- प्रकाशयोजना : युवराज केळूसकर
- नेपथ्य : विकास कांबळे, रोहित घोलप
- रंगमंच : शिरीष विचारे, मल्हार जोशी
- वेशभूषा: डॉ. राजश्री खटावकर

## पात्रपरिचय

- - विशाखा जोशी (सूत्रधार), आसावरी कुलकर्णी (सख्या), शोपन दास (बॅनर्जी), अजय फोंडेकर (शहा), अमृत सावंत (विनोद), श्रवण नाईक (मूर्ती), सिध्दू उटगी (धारगळकर), प्रवेश तारी (घडियाली), शुभम पाटील (सरदार), प्रशांत नागांवकर (प्रा. सुटेकर), स्वप्नील घुले (गुंड पाटील), सिध्दांत खांडेकर (ड्रायव्हर), दिव्या गावस (कंडक्टर), ऋतूजा बडवे (क्लिनर).
- ० दिग्दर्शक - डॉ. संजय तोडकर

## स्पर्धेची आज सांगता

- स्पर्धेची उद्या (बुधवारी) सांगता होणार आहे. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात सायंकाळी सातला अभिरुची संस्थेच्या 'ट्रायल' या नाटकाचा प्रयोग होईल.

जनसंपर्क कक्ष
20 DEC 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्यापासून मराठा इतिहास संशोधनाबाबत राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

## शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन

२० ते २२ डिसेंबर या कालावधीत शिवाजी विद्यापीठ संग्रहालय संकुलामध्ये शिवकालीन शस्त्रास्त्रांचे विशेष प्रदर्शन भरविण्यात आले आहे. प्रदर्शन तीन दिवस सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्वांना पाहण्यास खुले राहणार आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवराज्याभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षानिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावर शिवाजी विद्यापीठात बुधवारपासून (दि. २०) तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने परिषद आयोजित केली आहे.

बुधवारी दुपारी तीन वाजता शाहू महाराज यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचे उद्घाटन होईल. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'शिवराज्याभिषेक' या विषयावर बीजभाषण होईल. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

परिषदेत मराठा इतिहासाच्या सामाजिक-आर्थिक, सामाजिक-सांस्कृतिक, संदर्भ साधने व स्रोत, पुरातत्त्व, कला व स्थापत्य, लष्करी इतिहास, मराठा व युरोपियन अशा अनेक अंगांनी मराठा इतिहासाचा संशोधकीय वेध घेण्यात येणार आहे. दि. २२ रोजी ४.३० वाजता डॉ. अशोक चौसाळकर, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे संचालक तेजस गर्गे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत परिषदेचा समारोप होईल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास संशोधन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप आणि कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाचे सहाय्यक क्युरेटर उदय सुर्वे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2023
लोकमत

# आजपासून मराठा इतिहास संशोधनावर राष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवराज्याभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन दिनानिमित्त 'मराठा इतिहास' संशोधनाचा कक्षा विस्तार' या विषयावर शिवाजी विद्यापीठात बुधवारपासून शुक्रवारपर्यंत तीनदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास संशोधन केंद्राच्या समन्वयिका डॉ. नीलांबरी जगताप आणि कोल्हापूर वस्तू संग्रहालयाचे सहायक क्युरेटर उदय सुर्वे यांनी मंगळवारी दिली. पुरातत्त्व व वस्तू संग्रहालय संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे ही परिषद होणार आहे. आज, बुधवारी दुपारी ३ वाजता शाहू छत्रपती यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचे उद्घाटन होईल. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'शिव राज्याभिषेक' या विषयावर बीजभाषण होईल.

20 DEC 2023
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठा इतिहास संशोधनावर आजपासून परिषद

कोल्हापूर, ता. १९ : शिवराज्याभिषेक दिन आणि स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षानिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावर शिवाजी विद्यापीठात उद्या, बुधवारपासून तीनदिवसीय राष्ट्रीय परिषद होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास संशोधन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप आणि कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाचे सहायक क्युरेटर उदय सुर्वे यांनी आज दिली.

शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित या परिषदेचे उद्घाटन बुधवारी तीन वाजता श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होईल. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'शिवराज्याभिषेक' या विषयावर बीजभाषण होईल. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी प्रमुख उपस्थित असतील.

शुक्रवारी दुपारी साडेचार वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे संचालक तेजस गर्गे, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत परिषदेचा समारोप होईल. दरम्यान, विद्यापीठ संग्रहालय संकुलामध्ये आयोजित शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पाहण्यास खुले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2023
सकाळ

# भारत-चीन संबंधांबाबत आज विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठात उद्या बुधवारी 'भारत-चीन संबंध' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होणार असून, त्यात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंत थोरात हे बीजभाषण करणार आहेत, अशी माहिती राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी दिली.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन करण्यात येईल. पहिल्या सत्रात कर्नल शिव कुणाल वर्मा यांचे 'भारत-चीन संबंध' या विषयावर व्याख्यान होईल. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक श्रीराम पवार असतील. दुसऱ्या सत्रात डॉ. राहुल त्रिपाठी, सुखदेव उंदरे हे 'भारताचे परराष्ट्र धोरण' या विषयावर बोलतील. नेहरू अभ्यास केंद्राचे डॉ. प्रल्हाद माने सत्राध्यक्ष असतील. तिसऱ्या सत्रात ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर 'भारत-चीन संबंधांतील समकालीन प्रवाह' या विषयावर मांडणी करतील. डॉ. भारती पाटील सत्राध्यक्ष असतील. समारोप सत्र ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार आणि डॉ. रवींद्र भणगे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2023
पुढारी

# भारत - चीन संबंधाबाबत आज राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात बुधवारी (दि. २०) 'भारत-चीन संबंध' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विचारवंत डॉ. यशवंत थोरात बीजभाषण करणार आहेत, अशी माहिती राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, नेहरू अभ्यास केंद्राचे प्रल्हाद माने यांनी दिली.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात दि. २० रोजी स. ११ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन होईल. पहिल्या सत्रात कर्नल शिव कुणाल वर्मा यांचे 'भारत-चीन संबंध' या विषयावर व्याख्यान होईल. दुसऱ्या सत्रात डॉ. राहुल त्रिपाठी, डॉ. सुखदेव उंदरे 'भारताचे परराष्ट्र धोरण' या विषयावर बोलतील. तिसऱ्या सत्रात डॉ. अशोक चौसाळकर 'भारत-चीन संबंधातील समकालीन प्रवाह' या विषयावर मांडणी करतील. समारोप डॉ. रवींद्र भणगे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2023

क्रांतीसिंह

# विद्यापीठात कचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती

कोल्हापूर(प्रतिनिधी):-शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठ परिसरामध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती केली आहे. विद्यापीठ कचरा व्यवस्थापनासंदर्भात नुकतीच बैठक झाली. त्यावेळी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. पवार यांना सूचना करण्यात आल्या. यावर डॉ. पवार यांनी प्रकल्प समिती नेमून त्यावर काम सुरू केले. समितीमध्ये पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. असावरी जाधव,उद्यान अधीक्षक अभिजित जाधव, स्वच्छता निरीक्षक शशिकांत साळुंखे सदस्य म्हणून काम पाहत होते.

20 DEC 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खाकी वर्दीनंतर आता काळा कोट



## शिक्षणातील ३७ वर्षांच्या खंडानंतरही आर. आर. पाटील यांनी मिळवली कायद्याची पदवी

**कोल्हापूर** : पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस उपअधीक्षक असा प्रदीर्घ प्रवास करत असताना कर्तव्यात कधीही कसूर न होऊ देता खाकीशी इमान राखणाऱ्या आर. आर. पाटील तथा तात्या यांनी शिक्षणातील ३७ वर्षांनंतरच्या खंडानंतरही एल.एल.बी. ही कायद्याची पदवी मिळवली. त्यांचा हा या वयातील प्रवास आणि उत्साह तरुणांना अखंड प्रेरणादायी ठरणारा आहे.

राजाराम रामचंद्र तथा आर. आर. पाटील हे १९८४ साली विज्ञान शाखेतून पदवीधर झाले होते. यानंतर स्पर्धा परीक्षेतून त्यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती झाली. पोलीस उपअधीक्षक पदापर्यंत यशस्वी काम करून ते सेवानिवृत्त झाले. त्यांनी २०२१ मध्ये शिवाजी विद्यापीठात कायद्याच्या पदवीसाठी नियमित प्रवेश घेतला. त्यांनी त्यामध्ये यश मिळवले. सोमवार, दि. १८ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात त्यांनी ही कायद्याची पदवी स्वीकारली. कायद्याच्या विशेष पदवीचे शिक्षणही येत्या काही महिन्यांत पूर्ण होणार आहे.

माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील हे कायद्याचे पदवीधर होते. त्याचा वारसा बंधू आर. आर. पाटील यांनी जपला. आर. आर. आबांचे सुपुत्र रोहित पाटील हेही कायद्याचे शिक्षण घेत आहेत.

> कायद्याची परिपूर्ण माहिती सर्वसामान्य जनतेला नाही. त्यामुळे अनेक गुन्हे घडत असतात. त्यांना मार्गदर्शन करता यावे. तरुण पिढी आम्ही काय करावे किंवा अनेकांना निवृत्त झाल्यानंतर रिकाम्या वेळेत काय करावे, हा प्रश्न असतो. त्यामुळे वेळेचा सदुपयोग होण्यासाठी कोणत्याही वयात शिक्षण घेऊ शकतो. हा विचार रुजावा यासाठी कायद्याचे शिक्षण पूर्ण केले.
>
> – **ॲड. आर. आर. पाटील**, निवृत्त पोलीस उपअधीक्षक


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2023
तरुण भारत

# बालाजी हायस्कूलने पटकावला यसबा करंडक

कोल्हापूर : चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या पाचव्या स्मृतिदिनी आयोजित आंतरशालेय कला महोत्सव 'यसबा करंडक यंदा इचलकरंजी येथील बालाजी हायस्कूलने पटकावला. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग आणि चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महोत्सव आयोजिला होता. विद्यापीठातील भाषा भवन सभागृहात बक्षीस वितरण प्रसंगी नाट्यकर्मी प्रशांत जोशी यांना 'यसबा बालमित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यसबा' करंडक स्पर्धेमध्ये जिल्ह्यातून तब्बल २१ शाळांमधील ५५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी सादर केलेले मातीकाम, चित्रकला, निबंध, मूकनाट्य, एकपात्री, समूह गीत, समूह नृत्यांमुळे या स्पर्धांना रंगत आली. कला महोत्सवाचे उद्घाटन कलाप्रेमी दीपक मिरजे, साहित्यिक पी. जी. कुलकर्णी, नाट्यकर्मी केशव भागवत (बीड), बाळासाहेब कोडोलीकर यांच्या हस्ते झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2023
सकाळ


आरती तटगुंटी


अपेक्षा ढोणे


प्राजक्ता साळुंखे


खुशबू मुजावर

# वेटलिफ्टिंग स्पर्धेत विद्यापीठ महिला संघाचे यश

कोल्हापूर, ता. १९ : राजमुद्री (आंध्र प्रदेश) येथील आदिकवी अनन्या विद्यापीठात साऊथ वेस्ट झोन आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला खेळाडूंच्या संघाने एक सुवर्ण, रौप्य, कास्यपदकाची कमाई केली.

बेस्ट ऑफ एटमध्ये स्थान मिळवून अखिल भारतीय स्पर्धेसाठी हा संघ पात्र झाला. या संघात आरती राघवेंद्र तटगुंटी (अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले, सुवर्ण पदक) अपेक्षा दत्तात्रय ढोणे (बापूजी साळुंखे महाविद्यालय कराड, रौप्यपदक), प्राजक्ता मधुकर साळुंखे ( एल. बी. एस. महाविद्यालय सातारा, कास्य पदक), संघ प्रशिक्षक डॉ. प्रशांत पाटील यांचा समावेश आहे. त्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आदींचे सहकार्य लाभले. दरम्यान, अमृतसर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रिदमिक जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी विद्यापीठाची विद्यार्थिनी खुशबू वहीदा मुजावर हिची निवड झाली आहे. एम. ए. भाग एक (राज्यशास्त्र) विषयाची ती विद्यार्थिनी असून तिला राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पोवार, स्पोर्ट्स ऑफिसर पृथ्वीराज सरनाईक यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2023
पुढारी

# आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग महिला स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे यश

कोल्हापूर : साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ वेट लिफ्टिंग महिला स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने १ सुवर्ण १ रौप्य व १ कास्य पदक मिळवून यश संपादन केले.



सर्व संघातील महिला खेळाडूंनी बेस्ट ऑफ आठमध्ये स्थान मिळवून अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र झाले आहे. आरती तटगुंटी, अपेक्षा ढोणे, प्राजक्ता साळुंखे यांचा सघांत समावेश होता. संघ प्रशिक्षक डॉ. प्रशांत पाटील होते. खेळाडूंना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.